# मुंबई विद्यापीठ
## राष्ट्रीय सेवा योजना विभाग

वेबसाईट :-www.nssmu.in
राष्ट्रीय सेवा योजना विभाग,
विद्यापीठ विद्यार्थी भवन,
२ रा मजला, 'बी' रोड,
**चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.**


पत्र.क्र.रासेयो/ईसीडी/२०२३-२४/८०७
दिनांक : १२.१०.२०२३

**प्रति,**
**मा. प्राचार्य,**
राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत मुंबई विद्यापीठ अधिनस्त सर्व महाविद्यालये.

**विषय :** माजी राष्ट्रपती स्व.डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा दिनांक १५ ऑक्टोबर हा जन्मदिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करणेबाबत.

**संदर्भ :** मा. जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, मुंबई शहर, यांचे पत्र क्र. जि.अ. मु.श./सा.प्र./टे-४/वाचन प्रेरणा दिन/२०२३/७७३/१५७८३, दिनांक ०५ ऑक्टोबर, २०२३ रोजीचे पत्र.

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भिय शासन परिपत्रकान्वये माजी राष्ट्रपती स्व.डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचा दिनांक १५ ऑक्टोबर हा जन्मदिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करणेबाबत शासन स्तरावरून कळविण्यात आले आहे.

मराठी भाषेचा प्रचार व प्रसार हे मराठी भाषा विभागाचे मुख्य धोरण आहे. सदर शासन निर्णयानुसार वाचन प्रेरणा दिनानिमित्त मराठी भाषेची व्यापकता वाढविण्यासाठी, भाषेच्या प्रचार, प्रसार वृध्दीगत होण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करुन विविध प्रकारचे संदेश, व्याख्याने, चर्चासत्रे, अभिवाचन, सामुहिक वाचन, ग्रंथ प्रदर्शन इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे.

तसेच सदर शासननिर्णया मध्ये या वर्षी वाचन प्रेरणा दिन साजरा करण्याच्या दृष्टीने नेमके कोणते कार्यक्रम आयोजित करण्यात यावे या दृष्टीने सुचना देण्यात आलेल्या आहेत. त्याचे कृपया अवलोकन व्हावे.

त्यामध्ये या वर्षीच्या ३५० व्या शिवराज्याभिषेकाचे औचित्य साधुन छत्रपती शिवाजी महाराज्याच्या विचारांचा जागर मराठी मनात व्हावा म्हणून ३५० वा शिवराज्याभिषेक छत्रपती शिवाजी महाराजांचा, उत्सव शिवचरित्र पर पुस्तकांच्या वाचनाचा ही मध्यवती संकल्पना निश्चित करुण वाचन प्रेरणा दिनानिमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत.

वाचन संस्कृती जोपासण्यासाठी सर्वांनी मित्र, कुटुंबातील सदस्य इत्यादींना किमान एक पुस्तक भेट प्रोत्साहान द्यावे.तसेच सदर कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी मुंबई मराठी साहित्य संघ, मुंबई यांची मदत घेता येईल असे शासनाने कळविले आहे.

सदरहू शासन परिपत्रकान्वये वाचन प्रेरणा दिनाच्या अनुषंगाने नमूद केलेल्या उपक्रमांचे दिनांक १५ ऑक्टोबर, २०२३ पर्यंत आयोजित करावे व केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल या कार्यालयाकडे सादर करावा.

सबब संदर्भिय शासन परिपत्रका नुसार आपले स्तरावरुन १५ ऑक्टोबर हा जन्मदिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करणेबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. हि विनंती.

**आपला**

**सुशील शिंदे**
**विशेष कार्य अधिकारी, (रा.से.यो.)**

sd
**सुधीर पुराणिक**
**संचालक, रा.से.यो., मुंबई विद्यापीठ**